RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ५०] शुक्रवार, एप्रिल २३, २०२१/वैशाख ३, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ एप्रिल २०२१.

**आदेश**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि १९६७.**

क्रमांक कृबास-०१२०/प्र.क्र.१९/२१-स.—ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेला साथीचा रोग (Pandemic) कोरोना विषाणू (कोविड-१९) मुळे जगभर उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करता, कोरोना विषाणुचा संसर्ग टाळण्यासाठी राज्यात दिनांक २३ मार्च २०२० पासून लॉकडाऊन सुरू होता. कोरोनाचा विषाणुचा संसर्ग टाळण्यासाठी असलेल्या अनेक उपायांत Social Distance पाळणे महत्त्वाचे व आवश्यक असल्यामुळे, राज्यातील ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुका नियत झाल्या आहेत अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुका वाचा क्र. १ येथील आदेशानुसार वेळोवळी पुढे ढकलण्यात आल्या आहेत. कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी राज्याचा प्रबळ अंमलबजावणी सुरू आहे. परंतु, साथीचा रोग आटोक्यात येण्यास आणखी अवधी लागणार असल्याने कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका दिनांक २४ जानेवारी २०२१ पासून ३ महिन्यांसाठी पुढे ढकलण्याचे आदेश दिले आहेत. आणि सदर आदेशाची मुदत दिनांक २३ एप्रिल २०२१ रोजी समाप्त होत आहे ;

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीकरीता ग्रामपंचायत सदस्य आणि कृषि पतसंस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था येथून निवडून आलेले सदस्य हे मतदार आहेत, अशा राज्यातील बाजार क्षेत्रात काम करणाऱ्या कृषि पतसंस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था यांच्या निवडणुका वाचा क्र. ०२ येथील आदेशानुसार दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत कोविड-१९ चा संसर्ग वाढत असल्याच्या कारणास्तव पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यामुळे कृषि पतसंस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था यांच्या निवडणुका झाल्यानंतरच बाजार समित्यांच्या निवडणुका घेणे उचित होणार आहे ;

ज्याअर्थी, मार्च, २०२१ पासून राज्यात कोविड-१९ चा दररोज वाढत असलेला प्रादुर्भाव व त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाढत असलेली रुग्णांची संख्या विचारात घेऊन, कोविड-१९ चा प्रभाव कमी करण्यासाठी वाचा क्र. ०३ येथील आदेशानुसार "Break the chain" अंतर्गत राज्यात कलम १४४ लागु करून काही अंशी लॉकडाऊनची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशा परिस्थितीत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका सद्यस्थितीत घेणे उचित होणार नाही ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यानंतर " APMC Act, 1963 " असा उल्लेख आहे) मधील कलम १४ (३-अ) नुसार कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका १ वर्षापर्यंत पुढे ढकलण्याचे अधिकार शासनास आहेत. या तरतुदीनुसार आतापर्यंत १ वर्षापर्यंत निवडणुका वाचा क्र. १ येथील आदेशानुसार पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परंतु, APMC Act, 1963 च्या कलम ५९ नुसार, APMC Act, 1963 मधील कोणत्याही उपबंधातून बाजार समित्यांना सूट देण्याचा शासनास अधिकार आहे. त्यामुळे या प्राप्त अधिकारानुसार कोरोना विषाणू (कोविड-१९) मुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करता, सध्या विषाणुचा संसर्ग टाळण्यासाठी राज्यात प्रबळ अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे APMC Act, 1963 च्या कलम १४ (३-अ) मध्ये शिथीलता देऊन, बाजार समित्यांच्या निवडणुका आणखी पुढे ढकलणे आवश्यक झाल्याची शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५९ च्या तरतुदीअन्वये प्राप्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे असे आदेश देत आहे की :–

(१) ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुका नियत झाल्या आहेत व ज्या प्रकरणी मा.उच्च/मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे विवक्षित आदेश दिले आहेत, अशा कृषी उत्पन्न बाजार समित्या वगळून, राज्यातील इतर कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुका दिनांक २४ एप्रिल २०२१ पासून आणखी ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी म्हणजेच दिनांक २३ ऑक्टोबर २०२१ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

(२) या आदेशाच्या दिनांकास ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीची संचालक मंडळे कार्यरत आहेत, परंतू वरील मुदतवाढीच्या कालावधीत ज्या संचालक मंडळाची मुदत (Term) संपणार आहे, अशा संचालक मंडळांविरुद्ध अनियमिततेबाबत तक्रारी आहेत व अशा तक्रारीनुसार प्रत्यक्ष चौकशी सुरु करण्यात आली आहे, अशी संचालक मंडळे वगळून इतर संचालक मंडळांना, निवडणुका पुढे ढकलण्याचा म्हणजेच दिनांक २३ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे तथापि, अशा संचालक मंडळांना, त्यांचा ०५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच्या पुढील लगतच्या दिनांकापासून, मुदतवाढ मिळाल्याच्या दिनांकापर्यंत कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही, त्यांना फक्त अंतरिम व्यवस्था म्हणून काम पहाता येईल.

(३) सदर आदेशाच्या दिनांकास, ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक किंवा अशासकीय प्रशासक मंडळ कार्यरत आहेत, त्या प्रशासक किंवा अशासकीय प्रशासक मंडळास दिनांक २३ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**का. गो. वळवी,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.